लोकमत

# एप्रिल कूल... भुयारी मेट्रो येणार सेवेत!

## आरे ते बीकेसी पहिला टप्पा होणार सुरू, मुंबईकरांना ऐन उन्हाळ्यात मिळेल सुखकर प्रवासाची अनुभूती

सचिन लुंगसे
लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई** : देशातली पहिलीवहिली भुयारी मेट्रो असे विशेषण असलेल्या कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो-३चा पहिला टप्पा एप्रिल महिन्यात सुरू होणार असल्याची आनंदवार्ता आहे. आरे ते वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स (बीकेसी) असा हा पहिला टप्पा असून, त्यात दहा स्थानके आहेत. या सेवेमुळे पश्चिम उपनगरांतील मुंबईकरांना वांद्रेपर्यंत येता येणार असून, प्रवास सुसह्य होणार आहे.

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनकडून (एमएमआरसीएल) भुयारी मेट्रो-३चे काम सुरू आहे. दोन टप्प्यांत हे काम सुरू असून, पहिला टप्पा नव्या वर्षाच्या सुरुवातीला प्रवाशांच्या सेवेत येणार होता. मात्र, काही परवानग्या बाकी असल्याने त्यास विलंब झाला. आरे कारशेडच्या सर्व परवानग्या मिळालेल्या आहेत. केवळ १७७ झाडांचा प्रश्न होता. मेट्रो डेपोमध्ये नेण्यासाठीच्या परिसरात ही १७७ झाडे होती. या परिसराला 'शंटिंग नेक' असे म्हटले जाते. ही झाडे तोडल्याशिवाय या परिसरातील काम करता येत नव्हते. यासंदर्भातील परवानगी विलंबाने मिळाली. त्यामुळे काम करण्यास उशीर झाला. परिणामी मेट्रोच्या पहिल्या टप्प्याला विलंब झाला. मात्र, आता काम वेगाने सुरू असून, एप्रिल महिन्यात पहिला टप्पा सुरू होणार आहे.

**पहिला टप्पा** — **आरे ते बीकेसी** — **स्थानके** : १० (९ भुयारी तर १ जमिनीवर) — **अंतर** १२.४४ किलोमीटर

**दुसरा टप्पा** — **बीकेसी ते कफ परेड** — **स्थानके** : १७ — **अंतर** २१.३५ किलोमीटर




भुयारी मेट्रो ३च्या पहिल्या टप्प्यातील मार्गावरील एमआयडीसी या स्थानकाचे हे छायाचित्र.

### इतर मेट्रोंची स्थिती

**मेट्रो २ ब**
**लांबी** : २३ किमी
६०% बांधकाम पूर्ण
**कुठून कुठे** : डीएननगर ते मंडाले, २० स्थानके

**मेट्रो ५**
**लांबी** : १५ किमी
८२% बांधकाम पूर्ण
**कुठून कुठे** : ठाणे ते भिवंडी, सहा स्थानके

**मेट्रो ७ अ**
**लांबी** : २.५ किमी
२४% बांधकाम पूर्ण
**कुठून कुठे** : अंधेरी पूर्व ते सहार आंतरराष्ट्रीय विमानतळ

**मेट्रो ४ आणि ४ अ**
**लांबी** : ३५ किमी
६५% बांधकाम पूर्ण
**कुठून कुठे** : वडाळा ते कासारवडवली आणि कासारवडवली ते गायमुख

**मेट्रो ६**
**लांबी** : १५ किमी
७३% बांधकाम पूर्ण
**कुठून कुठे** : स्वामी समर्थनगर ते विक्रोळी, १३ स्थानके

**मेट्रो ९**
७७% बांधकाम पूर्ण
**कुठून कुठे** : दहिसर पूर्व ते मीरा-भाईंदर

**मेट्रो १२** : कल्याण-तळोजा, पर्यावरण मंजुरी प्रक्रिया सुरू आहे.